सन २०११-१२ ते २०१६-१७ या कालावधीतील ऑनलाइन पध्दतीने महाईस्कॉल पोर्टलवर नोंद झालेल्या तसेच सन २०१७-१८ या वर्षातील ऑफलाइन पध्दतीने स्वीकारण्यात आलेल्या विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती व फ्रीशीप योजने अंतर्गत नोंदणीकृत प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : इबीसी २०१७/प्र.क्र.७३/शिक्षण,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २४ मे, २०१९

वाचा :- १) शासन निर्णय, समक्रमांक, दि.२४.५.२०१८.
२) शासन परिपत्रक क्र.विभशा २०१८/प्र.क्र.१३६/शिक्षण, दि.२९.९.२०१८.
३) शासन पत्र क्र.संकिर्ण-२०१९/प्र.क्र.४२/शिक्षण, दि.१५.४.२०१९.
४) शासन निर्णय क्र.विभशा-२०१८/प्र.क्र.१३५/शिक्षण, दि.१९.६.२०१९.
५) शासन परिपत्रक क्र.इबीसी २०१७/प्र.क्र.७३/शिक्षण, दि.१०.५.२०१९.

शासन परिपत्रक-

वाचा क्र.५ येथे नमूद शासन परिपत्रकामध्ये विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे सन २०११-१२ ते २०१६-१७ पर्यंतच्या कालावधीतील फक्त महाईस्कॉल प्रणालीवर नोंद झालेल्या, परंतू अद्याप शिष्यवृत्ती अदा न झालेल्या अर्जावर त्वरीत कार्यवाही करुन सदर प्रलंबित अर्ज दि.३१ जुलै, २०१९ पर्यंत निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे वाचा क्र.५ येथे नमूद दि.१५ एप्रिल, २०१९ रोजीच्या पत्रात अंतर्भूत प्रपत्र “क” मध्ये सन २०११-१२ ते २०१६-१७ पर्यंतचे महाईस्कॉल प्रणालीवर नोंद झालेले परंतू आजअखेर प्रलंबित असलेले अर्ज व सदर अर्ज निकाली काढण्यासाठी आवश्यक निधी तसेच सन २०१७-१८ मध्ये ऑफलाईन द्वारे प्राप्त अर्ज व सदर अर्ज निकाली काढण्यासाठी आवश्यक निधी याबाबतची माहिती सादर करण्याच्या सूचना वाचा क्र.३ मध्ये येथे नमूद दि.१० मे, २०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या होत्या. सदर सूचनांनुसार त्वरीत कार्यवाही होणे अपेक्षित होते. परंतू आजपावेतो त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्याद्वारे राज्यातील शैक्षणिक संस्थामार्फत शैक्षणिक संस्थांना देत असलेल्या प्रलंबित शिष्यवृत्ती रकमेच्या अदायगीबाबत मा.मुख्यमंत्री तसेच अन्य लोकप्रतिनिधी यांचेकडे मोठया प्रमाणात तक्रारी प्राप्त होत आहेत. काही शैक्षणिक संस्थांनी मा.उच्च न्यायालयात याचिकाही दाखल केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली प्रलंबित शिष्यवृत्ती संदर्भात दि.२१.५.२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता आढावा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेअंती मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव यांनी विभागास दिलेले निर्देश विचारात

घेवून प्रलंबित शिष्यवृत्तीची प्रकरणे दि.३१ जुलै पर्यंत निकाली काढण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत:-

१) सन २०११-१२ ते २०१६-१७ या कालावधीत महाईस्कॉल प्रणालीवर नोंद झालेले परंतू आजपावेतो प्रलंबित अर्ज नेमके किती आहेत, याची वर्षनिहाय शैक्षणिक संस्थानिहाय आकडेवारी संबंधित सहायक आयुक्त यांनी निश्चित करावी. सदर माहिती तीन दिवसात शासनास सादर करावी.

२) सन २०१७-१८ मध्ये ऑफलाईनद्वारे प्राप्त झालेले अर्ज परंतू आजपावेतो प्रलंबित अर्ज नेमके किती आहेत, याची शैक्षणिक संस्थानिहाय आकडेवारी निश्चित करावी. सदर माहिती तीन दिवसात शासनास सादर करावी.

३) उक्त परिच्छेद १ व २ मध्ये नमूद कार्यवाही करत असतानाच समांतर पध्दतीने सन २०११-१२ ते २०१६-१७ या कालावधीत महाईस्कॉल प्रणालीवर नोंद झालेले परंतू आजपावेतो प्रलंबित अर्ज तसेच सन २०१७-१८ मध्ये ऑफलाईनद्वारे प्राप्त झालेले अर्ज परंतू आजपावेतो प्रलंबित अर्ज याबाबतची माहिती संबंधित सहायक आयुक्त यांनी जिल्हयातील शिक्षण संस्थांकडून ३० जून, २०१९ ही शेवटची संधी आहे, याबाबतचा पत्रात स्पष्ट उल्लेख करुन मागवून घ्यावी. त्यासाठी प्रत्येक शैक्षणिक संस्थेस स्वतंत्ररित्या लेखी स्वरुपात पत्र देवून त्यात प्रलंबित शिष्यवृत्ती अर्जाची माहिती सादर करण्याची शैक्षणिक संस्थांना दि. ३० जून, २०१९ ही अंतिम मुदत असल्याचे स्पष्ट करण्यात यावे. त्याचप्रमाणे सदर मुदतीनंतर सन २०११-१२ ते २०१६-१७ व सन २०१७-१८ या कालावधीतील प्रलंबित अर्जाबाबत कोणताही विचार करण्यात येणार नसल्याचे पत्रात नमुद करावे. शैक्षणिक संस्थांकडून प्राप्त झालेली माहिती सहायक आयुक्त यांचेकडील संकलित करण्यात आलेल्या महाईस्कॉलवरील माहितीशी पडताळून पाहावी. पडताळणीअंती शैक्षणिक संस्थेची माहिती व विभागाची माहिती मिळतीजुळती असल्यास त्या त्या संस्थेच्या प्रलंबित अर्जावर नियमानुसार पुढील कार्यवाही ३१ जुलै पर्यंत पूर्ण करण्यात यावी.

४) परिच्छेद क्र. ३ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करण्यात आलेल्या कार्यवाहीअंती ज्या शैक्षणिक संस्थांच्या प्रलंबित अर्जाची आकडेवारी व विभागाने संकलित केलेली आकडेवारी यात तफावत असेल, अशा शैक्षणिक संस्थांची स्वतंत्र बैठक घेवून संस्थेकडील आकडेवारी विभागाच्या अभिलेखातील आकडेवारीशी तुलना करुन पडताळण्यात यावी. सदर बैठकीत उपस्थित राहण्याऱ्या शैक्षणिक संस्थांच्या प्रतिनिधींचे हजेरी पत्रक बनवून त्यात त्यांचे संपूर्ण नाव, पदनाम, दुरध्वनी क्रमांक व स्वाक्षरी नोंदवावी. संस्थेमार्फत देण्यात आलेली प्रलंबित अर्जाची संख्या महाईस्कॉल प्रणालीवर नोंद झालेल्या त्या संस्थेच्या प्रलंबित अर्जाच्या संख्येशी जुळत नसल्यास त्याची कारणमिमांसा पडताळण्यात यावी. पडताळणीअंती संस्थेच्या आकडेवारीतील अर्ज संस्थेद्वारा महाईस्कॉल प्रणालीवर नोंदच झालेली नसल्यास, असे अर्ज आज विचारात घेता येणार नसल्याचे संस्थेला लेखी स्वरुपात कळवावे. या संपूर्ण कार्यवाहीचे इतिवृत्त तयार करुन त्यावर बैठकीत उपस्थित असलेल्या संस्थेचे अधिकृत प्रतिनिधी यांची स्वाक्षरी घ्यावी. बैठकीचे

हजेरीपत्रक, इतिवृत्त व अन्य अनुषंगिक दस्तावेज हे अभिलिखित करुन किमान ५ वर्ष जतन करुन ठेवावेत.

५) जर पत्रव्यवहार करुन सुध्दा काही संस्थांकडून प्रतिसाद मिळत नसेल तर सहायक आयुक्त यांच्याकडे ज्या संस्थांबाबत महाईस्कॉलवर जे काही प्रलंबित अर्ज असतील अशा अर्जांची तपासणी करुन विहित निकषांची पुर्तता करणारे अर्ज मंजूर करुन याबाबत संस्थांना लेखी कळवावे आणि त्याचे रेकॉर्ड ठेवावे. तसेच याबाबत कोणताही पुढील पत्रव्यवहार संस्थांकडून स्विकारता येणार नाही असे संस्थाना लेखी कळवावे.

६) महाईस्कॉलवर नोंद झालेल्या परंतू संस्थेच्या Log in मध्ये प्रलंबित असलेले अर्ज आजमितीस महाईस्कॉल प्रणाली बंद असल्यामुळे सहायक आयुक्त यांच्या Log in मध्ये Forward करता येत नाहीत. त्यामुळे असे अर्ज ऑफलाइन पध्दतीने विचारात घेवून अशा अर्जांची प्रचलित निकषांच्या आधारे पडताळणी करुन पडताळणीअंती हे अर्ज शिष्यवृत्ती/फ्रीशीपसाठी पात्र ठरत असल्यास ते मंजूर करण्याची कार्यवाही करावी. तथापि, महाईस्कॉल प्रणालीवर नोंद असलेल्या अर्जाव्यतिरिक्त अन्य अर्ज विचारात घेण्यात येवू नयेत. **महाईस्कॉल प्रणालीवर नोंद नसलेले अर्ज विचारात घेवून अशा अर्जांना मंजूरी देवून शिष्यवृत्ती रक्कम अदा झाल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित सहायक आयुक्तांना व्यक्तिशः जबाबदार धरुन नियमबाह्यरित्या अदायगी झालेल्या शिष्यवृत्ती रकमेची वसूली दंडनिय व्याजासह वसूल करण्यात येईल, याची विशेष गांभीर्याने नोंद घ्यावी.**

७) प्रसंगत: असेही सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रकात नमूद सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही दि.३१ जुलै, २०१९ पूर्वी पूर्ण करण्यात यावी. जेणेकरुन भविष्यात महाईस्कॉलवरील प्रलंबित अर्ज व सन २०१७-१८ मधील ऑफलाइन अर्जाबाबत शैक्षणिक संस्थांची कोणतीही तक्रार राहणार नाही.

८) सदर सूचनांनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीअंती जर एखाद्या संस्थेची शिष्यवृत्ती संदर्भात तक्रार असल्यास अशा शिक्षण संस्थांनी दि.१९ जून, २०१८ रोजीच्या शासन निर्णय क्र.विभशा-२०१५/प्र.क्र.१३५/शिक्षण अन्वये निर्माण करण्यात आलेल्या अर्धन्यायिक व्यवस्थेद्वारे त्यांच्या तक्रारीबाबत दाद मागण्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांना परिच्छेद ४ मध्ये नमूद कार्यवाहीसाठी आयोजित बैठकांच्या वेळी सूचित करावे. **सदर बैठकीच्या वेळी सदर शासन निर्णयाची प्रत बैठकीस उपस्थित शैक्षणिक संस्थांच्या अधिकृत प्रतिनिधींना देण्यात यावी व पोहोच घ्यावी.**

९) अंतत: असे स्पष्ट करण्यात येते की, सदर परिपत्रकातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात कसूर झाल्यामुळे तसेच आवश्यक ते दस्तावेज अभिलिखित न केल्यामुळे भविष्यात उद्भवू शकणाऱ्या न्यायालयीन प्रकरणी मा.न्यायालयासमोर विभागाने सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती सादर करणे अशक्य झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित सहायक आयुक्त यांची राहील, याची गांभीर्याने दखल घ्यावी.

१०) सदर परिपत्रकातील सूचनांनुसार दि.३१ जुलै, २०१९ पर्यंत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करण्यासाठी संबंधित प्रादेशिक सह आयुक्त यांनी त्यांच्या अधिनस्त जिल्ह्यातील सहायक

आयुक्तांकडून कालबध्द कार्यक्रम निश्चित करुन घ्यावा. तसेच सदर कालबध्द कार्यक्रमानुसार प्रस्तुत प्रकरणी उच्च प्राधान्याने कार्यवाही होईल यावर व्यक्तीशः पर्यवेक्षण ठेवावे.

११) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांनी सदर प्रकरणी होत असलेल्या कार्यवाहीबाबत दर १५ दिवसाला संबंधित प्रादेशिक सह आयुक्त यांचा आढावा घेवून दि.३१ जुलै, २०१९ पर्यंत ही कार्यवाही पूर्ण होईल, याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०१९०५२८१२५०३०९८२२ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAVINDRA VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d853d93c38d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC AND SBC DEPT, o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA VASANTRAO GURAV
Date: 2019.05.28 12:53:37 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण (सर्व)
३) सहायक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
४) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).